Review Of Research
Vol. 4 | Issue. 5 | Feb. 2015
Impact Factor : 3.1402 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# सोलापूर शहरातील झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांना शाळेत येण्यासंबंधीच्या अडचणींचा अभ्यास

**कु. मड्डी गुलरेज शौकतअली**
**एम्.ए., एम.एड. एम.फिल.**
**प्राध्यापक, मौलाना आझाद पोलीटेक्निक, सोलापूर.**

## १ प्रस्तावना:

कोणत्याही देशातील सर्वांत महत्वाची साधनसंपत्ती म्हणजे त्या देशातील मनुष्यबळ होय. हे मनुष्यबळ विधायक दृष्टीकोणाचे निर्माण करावयाचे असेल तर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावयास पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी १०० टक्के पटनोंदणी, उपस्थिती, दर्जेदार शिक्षण मिळणे गरजेचे आहे. समाजातील सर्व घटकांतील मुला-मुलींना शिक्षण प्रवाहात आणून, त्यांची उपस्थिती टिकवून, त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न व्हावयास पाहिजेत. अशा शालाबाहय मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या भारतीय समाजात ज्यांना शिकण्यात अनेक अडचणी येतात. अशी पुष्कळ मुले-मुली असून ती शिक्षणापासून वंचित आहेत. शिक्षणापासून वंचित असणारे अनेक घटक आहेत. त्यामध्ये अल्पसंख्याक, आर्थिकदृष्टया मागास, अनुसूचित जाती व जमातील मुले-मुली, विमुक्त व भटक्या जमातील मुले-मुली झोपडपट्टीतील मुले-मुली यांचा समावेश होतो.

त्यामधील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे झोपडपट्टीतील मुले-मुली. बहुसंख्य झोपडपट्टीतील मुले-मुली ही ६ ते १४ वयोगटातील असून ती शालाबाहय आहेत. झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण घेण्यासंबंधी अनेक अडचणी येतात. त्यांच्या अडचणी कोणकोणत्या आहेत? व त्यावर काय उपाय सुचविता येतात? याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अशा तळागाळातील, गरीब घटकांच्या शिक्षणाचा खरा विकास झाल्यास शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होईल. म्हणूनच सदर समस्येची निवड संशोधिकेने केली आहे.

## २. संशोधनाची गरज:

अन्न, वस्त्र, निवारा, या मुलभूत गरजा सर्वाच्या पूर्ण होत नाहीत. म्हणूनच एकीकडे मोठमोठया शहरामध्ये सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. तर ४० टक्के जनता आत्यंतिक गरिबीमुळे झोपडपट्टीत राहत आहे. मुंबईला धारावीची झोपडपट्टी जगातील २ नंबरची झोपडपट्टी मानली जाते. महानगरे, निमशहरे, तालुक्याची ठिकाणे, ग्रामीण भागामध्ये अनेक लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. अत्यंत निकृष्ट व प्रतिकूल वातावरणामध्ये या पालकांची मुले

वाढत असतात. या मुलांच्या शिक्षणविषयक समस्या खूप आहेत. ६ ते १४ वर्षाच्या वयोगटातील बहुसंख्य मुले झोपडपट्टीतील असून शालाबाहय आहेत. ही मुले शिकण्याच्या वयामध्ये काम करतात. तर शिक्षणापासून ही मुले वंचित राहण्याची कोणकोणती कारणे आहेत. त्यांचा शोध घेऊन उपाय सूचविण्यासाठी सदर संशोधनाची समस्या संशोधिकेला महत्वाची व गरजेची वाटते.

**३. संशोधनाचे महत्त्वः**

संशोधिकेच्या संशोधनामुळे शासन, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, शालेय प्रशासन अधिकारी, शिक्षणक्षेत्रामध्ये संशोधन करण्याऱ्या संशोधकांना तसेच विद्यार्थ्यांना याचा उपयोग होईल. झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांच्या विविध अडचणी लक्षात येतील व त्यावर उपाययोजना सूचवता येतील.

**४. समस्या विधानः**

सोलापूर शहरातील झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांना शाळेत येण्यासंबंधीच्या अडचणींचा अभ्यास.

**५. कार्यात्मक व्याख्याः**

- **सोलापूर शहरः**

महाराष्ट्र राज्यातील जिल्हयांपैकी सोलापूर हा एक स्वतंत्र जिल्हा आहे. त्यामध्ये ११ तालुक्यांचा समावेश असून सुमारे १० लाख लोकसंख्या आहे. महानगरपालिका हे प्रमुख प्रशासकीय ठिकाण असून प्रामुख्याने द्वितीय व तृतीय व्यवसाय केले जातात.

- **झोपडपट्टीः**

बहुसंख्य श्रमजीवी लोक, कामगार, मजुर, छोटे व्यावसायिक राहावयास जागा नसल्याने फुटपाथ, शासनाच्या रिकाम्या जागा, रेल्वे यार्ड, मोकळी मैदाने येथे अतिक्रमण करून झोपडपट्टी बांधतात. त्यास ‘झोपडपट्टी भाग’ म्हणून संबोधले जाते.

- **शालाबाहय मुलेः**

६ ते १४ वयोगटातील शाळेत न जाणारी मुले किंवा मुली म्हणजेच ‘शालाबाहय मुले’ होय.

**६. संशोधनाची उद्दिष्टेः**

**झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांना शिक्षणासाठीः**

१) कौटुंबिक परिस्थितीमुळे येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
२) आर्थिक परिस्थितीमुळे येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
३) सामाजिक परिसरासंबंधीच्या अडचणींचा अभ्यास करणे.
४) आरोग्यविषयक अडचणींचा अभ्यास करणे.
५) शिक्षणविषयक स्थिती व विचार जाणून घेणे.
६) शाळेत येण्यासाठी आवश्यक ते उपाययोजना सुचविणे.

**७. संशोधनाची गृहितकेः**

- झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांना शाळेत येण्यासंबंधी अनेक अडचणी येतात.

- झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांची कौटुंबिक परिस्थिती बिकट असते.
- झोपडपट्टीतील मुलांना शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण करून शाळेत आणता येते.

**८. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

१) सदर संशोधन हे सोलापूर शहराशी संबंधित आहे.
२) सदर संशोधनात सोलापूर शहरातील फक्त पाच झोपडपट्टयांचाच विचार केला आहे.
३) झोपडपट्टीतील शालाबाहय मुले व मुलींचाच यात समावेश केला आहे.
४) सदर संशोधन हे शालाबाहय मुलांना शाळेत येण्यासंबंधीच्या कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक अडचणी व त्यावर उपाययोजनापुरतेच मर्यादित आहे.

**९. संबंधित साहित्याचा आढावा:**

प्रस्तुत संशोधनाबाबत संबंधित संदर्भ साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा घेतला आहे. झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांवर आधारीत फक्त एकच संशोधन आढळते. सदर विषयावरील संशोधन कमी आढळले मासिक, त्रैमासिक, वर्तमानपत्रातील लेख, पुस्तक, पी.एच्. डी. व एम्.एड. स्तरावरील संशोधनांचा आढावा घेतला.

**१०. संशोधनाची कार्यपध्दती:**

संशोधिकेने झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांची सद्यस्थिती काय आहे हे जाणून घेण्यासाठी वर्णनात्मक पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे. सदर संशोधन वर्तमानकाळाशी संबंधित आहे. म्हणून सर्वेक्षण पध्दतीची निवड केली.

**११. संशोधन साधने:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांसाठी प्रश्नावली व त्यांच्या पालकांसाठी मुलाखत या साधनांचा वापर करून माहिती संकलित केली.

**१२. माहितीचे वर्गीकरण व अर्थनिर्वचन:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने सर्व प्रश्नांचे वर्गीकरण करून ४३ कोष्टके तयार केली. प्रत्येक कोष्टकाचे प्रश्न व प्रतिसादकांची प्रतिक्रिया यानुसार अर्थनिर्वचन केले गेले.

**१३. संख्याशास्त्रीय तंत्र:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने संख्याशास्त्रीय तंत्र शेकडेवारीनुसार प्रश्नांचे वर्गीकरण, विश्लेषण केले.

**१४. निष्कर्ष:**

**१४.१ शालाबाहय मुलांच्या प्रश्नावलीवरुन काढलेले निष्कर्ष:**

१) शालाबाहय मुले भाडयाच्या झोपडीत त्यांच्याच नातेवाईकांना भाडे देऊन राहतात. (कोष्टक क्र. १).
२) शालाबाहय मुलांच्या घरात वीजेची सोय असल्याचे प्रमाण जास्त आहे. (कोष्टक क्र. २).
३) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांच्या घरातील व्यक्तींची संख्या जास्त आहे. (कोष्टक क्र. ३).

४) झोपडपट्टीतील बहुसंख्य मुलांना पालक आहेत. (कोष्टक क्र. ४).
५) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांचे पालक नसण्याचे कारण निधन, घटस्फोट आहे व पालक नसणारी मुले भावनिक असुरक्षित असतात. (कोष्टक क्र. ५).
६) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांच्या घरात नेहमी भांडणे होतात. त्यामुळे घरातील वातावरण अशांत असते (कोष्टक क्र. ६, २२).
७) झोपडपट्टीतील सर्वाधिक शालाबाहय मुले कामाला जातात. त्यामुळे शाळेत जाऊ शकत नाहीत. (कोष्टक क्र. ७, ४१).
८) झोपडपट्टीत राहणाऱ्या शालाबाहय मुले व त्यांच्या पालकांबरोबर घरातील इतर व्यक्तीही बाहेरील कामे करतात. (कोष्टक क्र. ८,१०,११,१२).
९) झोपडपट्टी भागातील बहुसंख्य शालाबाहय मुलांचे वडील भिक मागतात. (कोष्टक क्र. ९).
१०) शालाबाहय मुले आर्थिक अडचणीमुळे घराबाहेरील कामे करुन पालकांना मदत करतात. (कोष्टक क्र. १३).
११) शालाबाहय मुलांना बाहेरील कामे करण्यास आवड नाही. परंतु बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना घराबाहेरील कामे करावी लागतात. (कोष्टक क्र. १४).
१२) बहुसंख्य झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांमध्ये हिंदु व इस्लाम धर्मियांचे प्रमाण सर्वाधिक आहे (कोष्टक क्र. १५).
१३) झोपडपट्टीतील शालाबाहय पालकांत व तेथील परिसरात व्यसनाचे प्रमाण जास्त आहे. (कोष्टक क्र. १६, १७, २०, २१).
१४) झोपडपट्टीतील शालाबाहय मुले जास्तीत जास्त अशिक्षित, निरक्षर मुलांच्या संगतीत राहतात.
(कोष्टक क्र. १८, १९).
१५) झोपडपट्टीतील लोक शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टीकोनातून पाहतात. (कोष्टक क्र. २३,२४,२६,४२,४३).
१६) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांच्या परिसरातील लोक शिक्षणासाठी आग्रही असल्याच्या कारणात न शिकल्यामुळे होणारे तोटे सांगतात. (कोष्टक क्र. २५).
१७) शालाबाहय मुलांचे दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांना आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. (कोष्टक क्र. २९,३५,३६).
१८) झोपडपट्टी परिसरात सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहाची व्यवस्था, स्वच्छ पाण्याचा पुरवठा नसणे व कचरा उचलण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे परिसरात अस्वच्छता, गलिच्छ वातावरण असते
(कोष्टक क्र. २७,२८,३०,३१,३२,३३, ३४,३५,३६).
१९) बिकट आर्थिक परिस्थितीमुळे झोपडपट्टीतील बहुतांश मुलांना अपुरे जेवण मिळते. त्यामुळे त्यांची रोगप्रतिकार शक्ती कमी असते. म्हणून ते विविध आजारांना बळी पडतात. (कोष्टक क्र ३७).
२०) झोपडपट्टीतील बहुसंख्य मुलांनी शाळेत कधीच प्रवेश न घेतल्यामुळे व ४ थी ते ५ वी पर्यंत शाळा शिकून सोडल्यामुळे शालाबाहय मुलांची संख्या जास्त आहे. (कोष्टक क्र. ३८,३९,४०).

## १४.२ पालकांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष:

१) सर्वाधिक पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक असल्यामुळे त्यांनी आपल्या पाल्याचे नांव शाळेत नोंदविले नाही. (प्रश्न क्र. १)
२) झोपडपट्टीतील बहुतांश मुलांनी ४ थी, ५वी नंतर शाळा सोडली. (प्रश्न क्र. २)
३) बहुतेक मुलांचे आर्थिक अडचणीमुळे शिक्षण अर्धवट झाले. (प्रश्न क्र. ३)
४) झोपडपट्टीतील शालाबाहय मुले आर्थिक अडचणीमुळे पालकांबरोबर कामाला जातात. (प्रश्न क्र. ४)
५) बहुसंख्य पालकांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे. बहुसंख्य पालक अडाणी आहेत व त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले नाही. (प्रश्न क्र. ५, ६, ११).
६) शासनाकडून व समाजाकडून कसल्याही प्रकारची अपेक्षा नसणारे उदासीन पालकांची संख्या जास्त आहे. (प्रश्न क्र. ७,९)
७) झोपडपट्टीतील बहुसंख्य पालकांना शासनाच्या शिक्षणविषयक विविध योजनांची माहिती नाही (प्रश्न क्र.८)
८) झोपडपट्टीतील परिसर शिक्षणासाठी अनुकूल नाही. (प्रश्न क्र. १०)
९) शालाबाहय मुलांच्या पालकांनी शिक्षण न घेतल्यामुळे त्यांना आपले आयुष्य हलाखीचे व कष्टाचे काढावे लागेल. (प्रश्न क्र. १२)
१०) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांना गरिबीचे व कष्टाचे, अपमानित जीवन जगावे लागेल. (प्रश्न क्र. १३, १८)
११) बहुसंख्य झोपडपट्टी परिसरात प्राथमिक शाळा आहेत. (प्रश्न क्र. १४)
१२) कुटुंबाच्या आर्थिक अडचणीमुळे बहुसंख्य पालक त्यांच्या पाल्याला म.न.पा.च्या शाळेत पाठवत नाहीत. (प्रश्न क्र. १५)
१३) झोपडपट्टीतील पालकांना त्यांच्या मुलाने शिक्षण घेतल्यास होणाऱ्या फायदयाविषयीची जाणीव आहे. (प्रश्न क्र. १६,१७,२०)
१४) झोपडपट्टीतील शालाबाहय मुलांच्या पालकांची सद्यस्थिती गरिबीची, दारिद्रयाची, हलाखीची आहे. (प्रश्न क्र. १९)

## १५ संदर्भ सूची

- **मराठी पुस्तके:**


१) अब्राहम, सी.एम. (ऑक्टो डिसें १९७९) **झोपडपट्टयांचा प्रश्न, शिक्षण, आणि समाज**, भारतीय शिक्षण संस्था, पुणे
२) कदम अ.ते., चव्हाण लुं.चु. (नोंव्हेबर २००६) **प्राथमिक शिक्षण: सद्यस्थिती व उपाय,** संस्कार प्रकाशन, लातूर.
३) कऱ्हाडे, बी.एम. (२००७) **शास्त्रीय संशोधन पध्दती,** पिंपळापुरे ॲन्ड कं.पब्लिशर्स, नागपूर—३२
४) कासार नि. (२००५) **नाशिक शहरातील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थीनींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक**

**परिस्थितीचा त्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास,** पी.एच्.डी., पुणे विद्यापीठ.
५) कुंडले म. बा. (२००३) **शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे—३०२)
६) घनवट, क.शि. (२००७), **हडपसर विभागातील मजुरांच्या मुलांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास,** एम्.एड्. पुणे विद्यापीठ.
७) जावडेकर श.(२६ नोंव्हेबर २००६) **दैनिक सकाळ.**
८) जोशी, अ., कुशारे (२०००) **संशोधनात प्रश्नावलीचे उपयोजन (पुष्प ७ वे)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक—४२२२२२.
९) दबडे रा.(ऑक्टोबर—डिसेंबर २००५) **शिक्षण आणि समाज.**
१०) दहिवले एस्. एम्., कांबळे पी.जी. (एप्रिल—जून १९९१) **शिक्षण आणि समाज**.
११) देशपांडे, ली. **सर्वेक्षण: एक संशोधन पध्दती,** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक—४२२२२२.
१२) देशपांडे व.सी., पाटील वा.रं. (नोंव्हेबर २००५) **भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण,** निराली प्रकाशन, पुणे.
१३) पारसनीस हे (नोव्हेंबर २००६) **शैक्षणिक संशोधन माहिती, संकलन तंत्रे व साधने,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे—३०
१४) पारसनिस हे.(नोंव्हेबर २००६) **शैक्षणिक संशोधन नमुना—निवड,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे—३०.
१५) पारसनिस, हे.,देशपांडे ली.(ऑगस्ट २००६) **शैक्षणिक कृती संशोधन,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे—३०
१६) पंडीत, ब.बि., (ऑक्टोंबर २००५) **शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक आणि गुणात्मक)** नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
१७) बनछोड, प्र.(ऑक्टोबर—डिसेंबर १९८५) **शिक्षण आणि समाज.**
१८) बापट, भा.गो., (१९८८) **शैक्षणिक संशोधन,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे—३०.
१९) भाळवणकर, वा. गो. (नोव्हेंबर २००६) **प्राथमिक शिक्षण: सद्यस्थिती, समस्या व उपाय**, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.
२०) भिंताडे वि.रा. (जून २००७) **शैक्षणिक संशोधन पध्दती**, नित्यनूतन प्रकाश, पुणे—३०.
२१) मल्लाडे प्र.(२७ ऑगस्ट २००६) **दैनिक सकाळ.**
२२) मुळे, रा.शं., उमाठे, वि.तु., (१९८७) **शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर—४४०००१.
२३) मंगरुळकर म, शिरकावे दा., कट्टी एस.आर. (नोंव्हेबर २००६) **प्राथमिक शिक्षण: सद्यस्थिती व उपाय,** फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२४) राव जी.एन्. (नोंव्हेबर २००४) **शिक्षण संक्रमण**.
२५) लोकप्रतिनिधीचे प्रशिक्षण (२००४) **हस्तपुस्तिका**, एस.सी.इ.आर. टी.
२६) वडनेरे, रा. (१९९९) **संशोधनात मुलाखतीचे उपयोजन (८ वे पुष्प)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक—४२२२२२.
२७) सर्व शिक्षण मोहिम, प्राथमिक शिक्षण सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम, **हस्तपुस्तिका** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे—३०.

- **इंग्रजी पुस्तके:**

२८) Best J. W. and J.V. Kahn : ***Research in Education***, Prentice Hall of India Private Limited, New Delhi-110001.

२९) Buch, M.B.,(1978-1983), ***Third Survey of Research in Education***, NCERT.

३०) Buch, M.B.,(1983-1988), ***fourth Survey of Research in Education***, NCERT.

३१) Karandikar S., ***Educating Street Children–An Enriching Experience***, Pune -30

३२) Kerlingrem F. N. ***Foundations of Behavioural Research***,
surjeet publication Delhi.

३३) Moulay, G.J. (1970) ***The Science of Education Research,*** Eurasia publishing house, New Delhi.

३४) Singh, A.N. (1996) ***The Child Ragpickers Socio-Economic Perspectives and Intervention Strateges,*** Shipra Publication, Delhi-110092.

३५) Varma, M., (1965) ***An Introduction to Educational Psychological Research,*** Asid Publishing House.